## For us, August 15 holds a special significance…

**by Narendra Modi 14. August 2009 21:12**

मित्रांनो,

ऑगस्ट म्हणजे क्रांतीचा महिना.

ऑगस्ट म्हणजे सण, उत्सव, जत्रा, यात्रांचा महिना. पण आमच्यासाठी १५ ऑगस्टचे महत्त्व अर्थातच जास्त आहे. कारण याच दिवशी शेकडो वर्षांच्या

गुलामीच्या श्रृंखला तोडून आपला देश स्वतंत्र झाला.

आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्याचा आनंद आपण उपभोगतो आहोत. स्वातंत्र्य मिळाल्यामुळेच आपण आपले विचार परस्परांपर्यंत

स्वतंत्रपणे पोहोचवू शकतो. आपल्याला हे स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या त्या वीर हुतात्म्यांना वंदन करण्याची हीच संधी आहे.

मित्रांनो, आज मला इथे आठवतोय एक आगळा अनुभव. तो आज मी तुमच्यापर्यंत पोहचवू इच्छितो आहे.

स्वतंत्र हिंदुस्थानातील श्रीनगरमध्ये स्वातंत्र्यानंतरही भारताचा तिरंगा फडकावणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे होते.

तशी परिस्थितीच शत्रूने निर्माण करून ठेवली होती.

दहशतवादी श्रीनगरच्या लाल चौकात तिरंग्याची होळी करत. आपल्या तिरंग्याला बुटाखाली तुडवत असत. कोट्यवधी भारतीयांच्या श्रद्धेला घायाळ करणारे हे कृत्य होते. पण अशा भयकारी दिवसातच १९९१-९२ मध्ये श्रीनगरच्या लाल चौकात तिरंगा झेंडा फडकाविण्याचा निर्णय झाला.

२६ जानेवारी १९९२ या दिवशी तिरंगा फडकाविण्याचे मुक्रर झाले. शिवाय कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंत एकता यात्रा काढण्याचाही निर्णय झाला. माझे नशीब चांगले, की भाजपने या सगळ्या आयोजनाच्या यशस्वितेची जबाबदारी माझ्यावर सोपवली. या एकता यात्रेदरम्यान घडलेल्या घटनेने मी अत्यंत भारावून गेलो.

एकता यात्रेचा रथ घेऊन आम्ही तमिळनाडूतून जात होतो. त्यावेळी शेतात काम करणारा, लुंगी परिधान केलेला एक गरीब शेतकरी धावत धावत रस्त्यावर आला. आमच्या ताफ्याला रोखण्याचा प्रयत्न करू लागला. रस्त्याच्या मधोमध उभा राहिल्याने यात्रा थांबविण्याशिवाय पर्याय नव्हता.

रथच थांबल्याने आमचा ताफाही थांबला.

डोळ्यात एक वेगळीच चमक घेऊन आलेला तो शेतकरी माझ्याकडे आला. त्याने माझ्या हातात ११ रूपये ठेवले. मग थोडा वेळ रथाकडे पहात राहिला.

जणू काही तो आमच्या प्रयत्नांनाच सलाम करत असावा. मग तमिळ भाषेत काही बोलू लागला.

तो काय बोलतो आहे, हे आमच्याबरोबर असलेल्या एका तमिळ सहकाऱ्याने आम्हाला सांगितले. त्याच्या म्हणण्याचा भावार्थ असा होता, की श्रीनगरच्या लाल चौकापर्यंत तर मी काही आपल्याबरोबर येऊ शकत नाही. पण मी आपल्याबरोबर आहे, असे समजून आपण आणखी एक तिरंगा त्या लाल चौकात फडकवा. त्या दिवशी त्या शेतकऱ्याच्या जाज्वल्य देशभावनेने देशाच्या उज्ज्वल भविष्याचे दर्शन मला घडले.

Copyright © 2009 NarendraModi.com

मित्रांनो, देशाचे शत्रू असलेल्या दहशतवाद्यांच्या सानिध्यात आणि गोळ्यांच्या वर्षावात श्रीनगरच्या लाल चौकात डौलाने तिरंगा फडकाविताना माझी छाती अभिमाने फुगली होतीच, पण तितकाच अभिमान मला त्या गरीब शेतकऱ्याच्या प्रचंड देशभक्तीविषयीही

आपणा सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या उदंड शुभेच्छा.

आपला सर्वांचा



Copyright © 2009 NarendraModi.com